**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३८१/१९९३ मधील निशाणी १२६ वर आदेश-</u>**

CNR : MHSN05-000023-1993

प्रस्तुत अर्ज वादीने कमिशन अहवालावर म्हणणे देण्यास परवानगी मिळण्याकरीता व त्यावर विना म्हणणे झालेला आदेश रद्द करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीचे कथनानुसार, उपअधिक्षक भूमी अभिलेख इस्लामपूर यांनी या प्रकरणी नकाशा व अहवाल सादर केलेला आहे. मात्र त्यावर वादीतर्फे म्हणणे द्यावयाचे राहून गेलेले आहे. त्यामुळे दि. २६.११.२०१९ रोजी वादीविरुद्ध विना म्हणणे आदेश झालेला आहे. तो आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ने अर्जास म्हणणे देवून वादीने कोणतेही योग्य कारण दिलेले नसल्याचे नमुद केले व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद मी ऐकला आहे.

४. या प्रकरणी मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार भूकरमापक यांची कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात आली व प्रकरण मोजणीकरीता पाठविण्यात आले होते. सदर प्रकरण हे मोजणी अहवाल येण्याकरीता बराच कालावधी प्रलंबित होते. या न्यायालयाकडून वारंवार पाठपुरावा झाल्यानंतर सरतेशेवटी दि. ११.१०.२०१९ रोजी निशाणी १२१ नुसार उपअधिक्षक भूमी अभिलेख इस्लामपूर यांनी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालावर दोन्ही पक्षांचे म्हणणे मागविण्यात आले होते. दि. १२.११.२०१९ रोजी वादीतर्फे म्हणणे देण्यास मुदत मागण्यात आली होती. यानंतर दि. २६.११.२०१९ रोजी वादीतर्फे म्हणणे न दिल्याने म्हणणे नाही असे गृहीत धरण्यात आले व मुद्दे नव्याने स्थापित करण्यात आले आहेत. प्रकरण पुराव्याकरीता प्रलंबीत असताना व त्याकरीता वादीने मुदतीचे अर्ज दिल्यानंतर दि. ०५.०२.२०२० रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५.		वास्तविक पहाता वादी यास सदर प्रकरणी अहवाल दाखल झाल्याची पूर्ण माहिती होती व त्यास पुरेशी संधी देखील देण्यात आलेली होती. तरी देखील सदर विलंब झालेला आहे. विलंबाकरीता दिलेले कारण फारसे संयुक्तीक नाही. तरी परंतु, एकंदरीत गुणदोष पहाता वादी यास एक संधी देणे मला आवश्यक वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. वादीने या अर्जासोबत दिलेले म्हणणे प्रकरणी समाविष्ट करण्यात येते.

Digitally signed by Abhijit Rajshekhar Solapure

इस्लामपूर						(अभिजीत रा. सोलापुरे)
दिनांक–१२.०३.२०२०				दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर